IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 4.819
Volume 7, Issue 1, July 2019

# स्वच्छता ही सेवा

## डॉ. प्रविण कोहळे

मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय नरखेड

Email: pravinkohale67@gmail.com

**सारांश**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी स्वच्छता आणि साफसफाईचे जोरदार समर्थन केले. त्यांच्या मते वैयक्तिक आणि सामाजिक कल्यांणासाठी स्वच्छता ही अत्यावश्यक बाब होती. स्वातंत्र्यापेक्षा साफसफाई महत्त्वाची आहे असे त्यांचे वचन प्रसिद्ध आहे. यातून त्यांनी, निरोगी आणि स्वावलंबी राष्ट्रासाठी स्वच्छ आणि आरोग्यदायक वातावरण ही पूर्वअट असल्याचे अधोरेखित केले. महात्मा गांधी यांनी दैनंदिन जीवनात स्वच्छतेच्या महत्त्वावर भर दिला आणि विशेषतः ग्रामीण भागातील लोकांना आपल्या स्वभावतेच्या स्वच्छतेचे दायित्व उचलण्याचे आवाहन केले. स्वच्छतेविषयीचे त्यांचे विचार भारताच्या सार्वजनिक आरोग्य चळवळींचा पाया बनले आणि अधिक स्वच्छ भारताच्या निर्मितीचे उद्दिष्ट ठेवणाऱ्या स्वच्छ भारत अभियाना सारख्या आधुनिक उपक्रमांचा पायाही त्या विचारांनी घातला.

पंतप्रधानांनी 2 ऑक्टोबर 2014 रोजी सुरू केलेले स्वच्छ भारत अभियान (एसबीएम) स्वच्छता, साफसफाई आणि आरोग्यकारकतेच्या दिशेने भारताच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण मैलाचा दगड आहे. या महिन्यात या अभियानाला दहा वर्षे पूर्ण होत आहेत. या अभियानाने अनेकदा उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सर्वात महत्त्वाचे यश म्हणजे 2019 पर्यंत सरकारने ग्रामीण भारत हागणदारीमुक्त घोषित केला. 11 कोटींहून अधिक शौचालये बांधली गेली, आणि लक्षावधी कुटुंबांना – विशेषतः ग्रामीण भागातील कुटुंबांना त्याचा फायदा झाला. यामुळे आरोग्यकारकतेत मोठी वाढ झाली आणि जलजन्य आजार कमी झाले. स्वच्छता आणि साफसफाईबाबत सामाजिक वर्तन बदलण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली.

एसबीएमचे यश हे केवळ सरकारी उपक्रमांचे फलित नसून सर्वसामान्य नागरिकांच्या सक्रिय सहभागाचाही तो परिणाम आहे. स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी ख्यातनाम व्यक्तिमत्त्वे, समाजमाध्यमांवरील प्रभावशाली व्यक्ती आणि सर्वसामान्य नागरिकांना या मोहिमेत सहभागी करून घेण्यात आले होते. स्वच्छता हीच सेवा सारख्या मोहिमांमुळे देशभरातील लक्षावधी स्वयंसेवक उत्स्फूर्तपणे स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले. दरवर्षी करण्यात येणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षणामुळे भारतातील सर्वात स्वच्छ शहर बनण्यासाठी शहरांमध्ये निरोगी स्पर्धा निर्माण झाली आहे. इंदूर, सुरत आणि नवी मुंबई सारख्या शहरांनी सातत्याने उच्च स्थान पटकावले आहे, इतरांनाही त्याचे अनुकरण करण्यास प्रोत्साहित केले आहे. एसबीएम टप्पा– दुसरा (2020 पासून) सुरू झाल्यानंतर पहिल्या टप्प्यातील यश सांभाळून, जलसंधारण, निमस्वच्छ (ग्रेवॉटर) जलव्यवस्थापन आणि शाश्वत स्वच्छता पद्धतींवर भर देण्यात आला. स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या उन्नतीवर आणि त्यांना प्रतिष्ठापूर्ण वागणूक देण्यावरही अभियानाने भर दिला. काम करण्यासाठी चांगली परिस्थिती, सुरक्षा साधने आणि कचरा व्यवस्थापनासाठी प्रशिक्षण देण्यासाठी कार्यक्रम सुरू करण्यात आले आहेत.

**प्रस्तावना :–**

भारतात स्वच्छता या विषयाची ऐतिहासिक पाळे–मुळे इतकी खोलवर रुजली आहेत, की ती सिंधू संस्कृती पर्यंत पोहोचली आहेत. या संस्कृतीमध्ये हडप्पा आणि मोहेंजो–दारो सारख्या शहरांतून प्रगत कचरा व्यवस्थापन यंत्रणेचे दर्शन घडते. अशा प्रेरणादायक परंपरा अस्तित्वात असूनदेखील आधुनिक भारताला मात्र वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येसाठी पुरेशा प्रमाणात स्वच्छतेच्या सोयी पुरवण्याच्या बाबतीत गंभीर स्वरूपाच्या आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. वर्ष 2014 मध्ये देशात केवळ 39

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 4.819
Volume 7, Issue 1, July 2019

टक्के लोकसंख्येची सोय होईल इतक्याच स्वच्छतेच्या सुविधा निर्माण करण्यात आल्या होत्या. त्यावेळी देशातील 55 कोटी लोकांना, विशेषतः ग्रामीण भागातील जनतेला शौचालयांसारख्या मूलभूत स्वच्छताविषयक सोयी देखील उपलब्ध नव्हत्या आणि त्यामुळे उघड्यावर शौच विसर्जनासारख्या प्रकारांचा अवलंब करावा लागत होता. मूलभूत हक्कांच्या बाबतीत वंचित असलेला समाजातील महिलावर्ग अंधःकाराचा गुलाम झाला होता. स्वच्छतेच्या या अभावाचा महिला आणि लहान मुलांवर प्रमाणाबाहेर प्रभाव पडला आणि त्यामुळे त्यांना आरोग्य आणि सुरक्षाविषयक जोखीम तसेच सामाजिक–आर्थिक आह्वाने यांना तोंड द्यावे लागले.

स्वच्छतेच्या सोयींमध्ये सुधारणा करण्याच्या दिशेने सुरु झालेला भारताचा प्रवास प्रदीर्घ काळ सुरु आहे. वर्ष 1986 मध्ये प्रामुख्याने शौचालयांच्या उभारणीवर लक्ष केंद्रित करणाऱ्या केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमासह (सीआरएसपी) हा प्रवास सुरु झाला. या कार्यक्रमापाठोपाठ वर्ष 1999 मध्ये संपूर्ण स्वच्छता अभियानाची (टीएससी) सुरुवात करण्यात आली. यामध्ये माहिती, शिक्षण आणि संवाद (आयईसी) विषयक उपक्रमांच्या माध्यमातून स्वच्छतेसाठी मागणी निर्माण करण्यावर अधिक भर देण्यात आला होता. वर्ष 2012 मध्ये निर्मल भारत न अभियानाच्या (एनबीए) माध्यमातून, समुदायाच्या पुढाकाराच्या दृष्टिकोनावर अधिक भर देऊन स्वच्छतेसाठीच्या या – प्रयत्नांचा अधिक विस्तार करण्यात आला.

## उद्देश

1. समाजातील लोकांचे परिसरस्वच्छता या विशयी मत अभ्यसाणे
2. समाजातील लोकांच वैयक्तीक व आरोग्यविशयी मत अभ्यासणे
3. षासनाच्या धोरणाविशयी मत अभ्यासणे

## उपकल्पना

- स्वच्छता विशयी जनजागृती करणे
- स्वच्छता विशयी षासनाने कठोर भुमीका घेतली आहे.

## संषोधन पद्धती :

प्रस्तुत संषोधनात दुय्यम साधन सामुग्रीचा वापर करण्यात आला असून त्यासाठी विविध संदर्भ आधार घेवून विषिश्ठ उद्देष डोळयासमोर ठेवून प्रस्तुत विशयावर प्रकाष टाकण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

स्वच्छ भारत अभियान का सुरु करण्यात आले ?

स्वच्छता हा एक बहुआयामी विषय आहे हे तथ्य मान्य करणे हा एसबीएम सुरु करण्यामागील तर्कशुद्ध विचार आहे. स्वच्छतेच्या अभावामुळे सार्वजनिक आरोग्य, स्त्री–पुरुष समानता, पर्यावरणीय शाश्वतता तसेच आर्थिक विकास या सर्वांवरच वाईट परिणाम होतो. एकमेकांशी जोडलेल्या या सर्व आह्वानांचा समग्रपणे सामना करून त्यांच्यावर उपाययोजना करण्याच्या उद्देशाने स्वच्छ भारत अभियानाची सुरुवात करण्यात आली.

## आरोग्यावरील परिणामः

अपुऱ्या स्वच्छता सुविधा या सामान्य जनतेमध्ये, विशेषतः पाच वर्षापेक्षा कमी वयाच्या लहान मुलांमध्ये डायरिया म्हणजेच , हगवण, कॉलरा म्हणजेच पटकी आणि टायफॉईड अर्थात मुदतीचा ताप यांसारख्या ना जलजन्य आजारांचे मुख्य कारण ठरतात. आणि त्यामुळे उच्च रोगदर आणि मृत्युदर यांना कारणीभूत होतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) – अहवालानुसार, स्वच्छ

भारत अभियान सुरु होण्याआधीच्या काळात भारतातील अपुऱ्या = स्वच्छताविषयक सेवांमुळे दरवर्षी सुमारे 3 लाख बालकांचा मृत्यू होत होता. नेचर या संस्थेने नुकत्याच दिलेल्या अहवालानुसार स्वच्छ भारत अभियान या उपक्रमामुळे – बालमृत्यूंच्या दरात लक्षणीय घट दिसून आली असून आता हे प्रमाण महिला 60000 ते 70000 बालमृत्यूं पर्यंत कमी झाले.

**महिला तसेच लहान मुलांवरील न परिणामः**

शौचालयाची सुविधा प्राप्त न झाल्यामुळे महिला तसेच मुलींच्या आरोग्यावर विपरीत परिणाम झालेले क दिसतात. महिलांना अनेकदा खुल्या मैदानात, शेताडीत शौचाला जाणे भाग पडते आणि त्यामुळे त्यांचा छळ होण्याचा किंवा त्यांच्यावर आक्रमण होण्याचा धोका संभवतो. मुली, विशेषतः ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थिनी स्वच्छतेसाठीच्या अपुऱ्या सुविधांमुळे मासिक पाळीच्या दिवसांमध्ये शाळेत जाऊ शकत नाहीत. यामुळे शैक्षणिक गळतीचे प्रमाणही मोठे आहे. बीएमजीएफ संस्थेच्या अभ्यासानुसार, हागणदारीमुक्त नसलेल्या भागांमध्ये, बालकांतील कुपोषणाचे प्रमाण 58ः आहे. अशा भागांमध्ये स्वच्छ भारत अभियानामुळे पोषण तसेच उत्पादकता यांमध्ये सुधारणा होण्यास मदत झाली आहे. या अभियानामुळे महिलांची सुरक्षितता तसेच सन्मान यांची जपणूक होत असून महिलांना त्यांच्या घरातच शौचालय उपलब्ध झाल्यामुळे त्यांना अधिक सुरक्षित वाटू लागले आहे. (युनिसेफ)

**पर्यावरणावरील परिणामः**

**उघड्यावरील मलमूत्र विसर्जन आणि अयोग्य पद्धतीचे कचरा व्यवस्थापन पर्यावरणाचा**

दर्जा घसरण्यास कारणीभूत ठरते. प्रक्रिया न केलेल्या सांडपाण्यामुळे जलसाठे प्रदूषित होतात, सागरी तसेच तटवर्ती परिसंस्थांना हानी पोहोचते तसेच ते सांडपाणी माती, हवा यांच्या प्रदूषणाला कारणीभूत ठरुन सार्वजनिक आरोग्याला असलेले धोके आणखी वाढवते. युनिसेफ संस्थेच्या अहवालानुसार, स्वच्छ भारत अभियानाने पर्यावरण रक्षणाला मोठी मदत केली कारण या अभियानामुळे, हागणदारीमुक्त गावांमध्ये माणसांमुळे होणारे भूजल प्रदूषण 12.70 पटींनी कमी झाले.

**आर्थिक परिणामः**

स्वच्छतेच्या अपुऱ्या सुविधांमुळे भारताला फार मोठी किंमत चुकवावी लागते. जागतिक बँकेतर्फे केलेल्या अभ्यासात असे दिसून आले आहे की भारताने अस्वच्छतेमुळे वर्ष 2006 मध्ये त्याच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या 6.4 टक्के इतके नुकसान सहन केले आहे आणि ही रक्कम वार्षिक पातळीवर 38 अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी प्रचंड आहे.

**संदर्भ :–**

[1].आरोग्य पत्रीका – 2000

[2].शिक्षण संक्रमण – 2000